# मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

**दावा क्रमांक १५४/२०२२**

१) श्री. श्रीपाद पांडूरंग खिस्ती व इतर **---- वादी**

***विरुध्द***

१) जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व इतर. **---- प्रतिवादी**

**<u>निशाणी-५ वरील आदेश</u>**

१) वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ संस्थेच्या सन २०२२-२३ ते २०२७-२८ या काळा करिता व्यवस्थापक समिती सदस्य पदासाठीची दि.२०/०५/२०२२ रोजी झालेल्या निवडणुकीतील फेरमतमोजणी कोर्ट कमिशनर नेमणुक करण्याकरिता केला असुन, वादीचे कथन आहे की, संस्थेच्या निवडणुकीतील मतमोजणीनंतर मतदानाची आकडेवारी जूळत नाही. ही बाब वादी व त्यांचे सहकारी यांनी प्रतिवादी क्र.२ यांना सांगितली आणि सर्वसाधारण मतदार संघातील उमेदवाराची फेरमतमोजणी घेण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी क्र.२ यांना केली. परंतु त्यांनी कोणतीही दखल न घेता प्रतिवादी क्र.४ यांच्या सांगण्यावरुन मतमोजणी प्रक्रिया तात्काळ उरकून निकाल घोषीत केला. त्यानंतर दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी प्रतिवादी क्र.२ यांनी मतमोजणीत झालला घोळ दुरुस्त करण्याच्या हेतूने सर्वसाधारण मतदार संघातील केंद्र क्र.४ मध्ये उमेदवार क्र.८ यांना १५२ ऐवजी ५५ मतदान झाल्याचे दाखविले आणि उमेदवाराची एकुण ९७ मते प्रतिवादी क्र.२ यांनी अचानकपणे कमी करुन टाकली व आकड्याची

जुळवाजूळव करुन पुन्हा नव्याने सर्वसाधारण मतदार संघातील उमेदवारांना मिळालेल्या एकुण ४ मतदान केंद्रात झालेल्या मतदानाची एकत्रित आकडेवारी घोषीत केली आहे. परंतु सदर मतमोजणी शिटवर तारीख व वेळ ही जूनीच दाखवली आहे.

२) प्रतिवादी क्र.२ यांनी केलेल्या खाडाखोडीबाबत कोणतेही शुध्दीपत्र न काढता परस्पर मतमोजणी तक्त्यामध्ये खाडाखोड केली आहे. प्रतिवादी क्र.२ यांना कायद्याने तसा कोणताही अधिकार नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी उमेदवारनिहाय मिळालेल्या तक्त्यात खाडाखोड केली असली तरीही गुणपत्रकात त्यांना एकुण झालेले मतदान ३३८ दाखविले असुन त्यांचा गुणानुक्रम १५ दर्शविला आहे. त्यामुळे उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांचा एकत्रित तक्ता व गुणपत्रक यातील आकडेवारी जूळत नसल्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी घोषीत केलेले निकाल पत्र हे मुळता चूकीचे व बेकायदेशीर आहे. वास्तविक प्रतिवादी क्र.२ यांना अंतिम निकाल जाहीर केल्यानंतर अशी मते कमी करण्याचा कोणताही अधिकार नाही. वादीच्या म्हणण्याप्रमाणे निवडणूकीमध्ये ९५ सदस्यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आणि त्यापैकी काही नामनिर्देशन पत्र मागे घेतल्यानंतर ४२ उमेदवारांचे नामनिर्देशन पात्र ठरले. ४२ उमेदवारांपैकी प्रत्येकी १३ उमेदवारांचे तीन पॅनल तसेच तीन अपक्ष उमेदवार उभे होते. वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२६ ते ३७ यांचे पॅनलचे नाव म्हसोबा महाराज सहकार प्रगती पॅनल तर वादी क्र.२ व ३ आणि प्रतिवादी क्र.१५ ते २५ यांचे पॅनलचे

नाव किसान क्रांती पॅनल होते आणि प्रतिवादी क्र.४ ते १४ तसेच प्रतिवादी क्र.४१ व ४२ यांचे पॅनलचे नाव वळणेश्वर विकास पॅनल होते.

३) मतदानाच्या दिवशी सर्वसाधारण मतदार संघात एकुण १२८९ पात्र मतदारांपैकी ११९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आणि त्यापैकी वैध मतपत्रिका ११४४ असुन अवैध मते ४९ आहे. महिला मतदार संघात १२८९ पात्र मतदारां पैकी ११९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. अनु.जाती जमाती मतदार संघात एकुण १२८९ पात्र मतदारांपैकी ११९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. भटक्या विमुक्त जाती/जमाती मतदार संघात एकुण १२८९ पात्र मतदारां पैकी ११९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. इतर मागासवर्ग मतदार संघात एकुण १२८९ पात्र मतदारां पैकी ११९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. वैध मतपत्रिका ११७९ असुन अवैध मते ११ आहेत व तीन मतपत्रिका मिळुन आल्या नाहीत. वादीचे म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी निवडणूकी करिता मतदान घेण्याचे ठिकाण नंतर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल असे सांगितले होते, परंतु प्रतिवादी क्र.२ यांनी मतदानाचे ठिकाण कधीही प्रसिध्द केले नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी निवडणूक कार्यक्रम प्रतिवादी क्र.४ ते १४ तसेच प्रतिवादी क्र.३७ व ३८ यांच्या पॅनलचे प्रमुख प्रतिवादी क्र.४ यांच्या दबावाखाली आणि त्यांच्या पॅनलला मदत करण्याच्या हेतूने आणि नैसर्गिक न्यायतत्वाची पायमल्लीकरुन निवडणूक पार पाडली आहे. करिता वादीचा अर्ज दाखल.

४) वादीच्या या अर्जाला प्रतिवादी क्र.६,७ व ९ तर्फे उत्तर निशाणी-५६ कडे दाखल करुन निवेदन केले की, प्रतिवादी क्र.२ यांनी निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याप्रमाणे निवडणूक पारपाडली आणि निवडणूक निकाल दि.२०/०५/२०२२ रोजी जाहीर केला. वादी व त्यांचे पॅनल प्रमुख व इतर उमेदवार यांनी मतमोजणीवेळी कोणत्याही प्रकारे तक्रार दाखल केली नव्हती आणि केवळ निवडणूकीमध्ये पराभव झाल्याने खोटया व बनावट तक्रारी करुन दावा दाखल केला. निवडणुकीचे मतदानाच्या वेळी प्रत्येक उमेदवाराचे प्रतिनिधी हजर होते. वादी यांनी त्यावेळी कोणतीही हरकत घेतली नाही. मतदान पूर्ण झाल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांनी मतमोजणी उमेदवार व प्रतिनिधी समक्ष केली आहे त्यावेळी देखील वादी किंवा अन्य कोणीही हरकत घेतली नाही. प्रतिवादी क्र.२ यांनी नियमानुसार मतमोजणी करुन निवडणूक निकाल जाहीर केला. वादी यांना निकाल जाहीर झाल्यानंतर निवडणूक रद्द करुन मागण्याचा अधिकर नाही. प्रतिवादींनी वादीने या अर्जात केलेले सर्व कथन नाकारले.

५) वादी आणि प्रतिवादींच्या कथनावरुन मुद्दा उपस्थित होतो की, संस्थेच्या **निवडणूकीतील फेरमतमोजणी कोर्ट कमिशनर मार्फत करणे आवश्यक आहे काय? उत्तर होकारार्थी असेल.** वादीने प्रतिवादीं विरुध्द दावा दाखल करुन प्रतिवादी क्र.३ संस्थेची सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीची दि.२०/०५/२०२२ रोजी झालेली निवडणूक बेकायदेशीर असल्याबाबतची मागणी केली. वादीने त्यांच्या दाव्यात आणि

अर्जामध्ये उमेदवारनिहाय मिळालेल्या मतांचे वर्णन केले असुन वादीने सदरच्या अर्जामध्ये मुद्दा उपस्थित केला की, प्रतिवादी क्र.२ यांनी मतमोजणीमध्ये झालेला घोळ मतमोजणीनंतर दोन-तीन दिवसांनी दुरुस्त केला आणि उमेदवार क्र.८ यांना १५२ ऐवजी ५५ मतदान झाल्याचे दाखवले. अशाप्रकारे ९७ मते प्रतिवादी क्र.२ यांनी कमी करुन टाकलेली आहेत. याशिवाय वादी यांनी दाव्यात मतमोजणी संदर्भात आणि मतपत्रिके संदर्भात मुद्दे उपस्थित केले आणि त्याच आधारे वादींनी दावा दाखल केला.

६) वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.४ ते १६ हे निवडणूकीत निवडून आलेले उमेदवार आहेत. आणि या उमेदवारांनी प्रतिवादी क्र.२ यांच्यावर दबाव आणून त्यांच्याकडून बेकायदेशीरपणे निवडणूक पारपाडून घेतली. याउलट प्रतिवादी यांनी वादीचे हे म्हणणे नाकारले. प्रतिवादी यांनी त्यांच्या उत्तरामध्ये वादीने केलेल्या कथनाचे स्पष्टपणे खंडन केले नाही आणि केवळ मान्य व कबुल नाही अशाप्रकारे कथन केले. वर उल्लेख केल्याप्रमाणे वादी यांनी अर्जात आणि दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ यांनी कशाप्रकारे मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर दुरुस्ती केली याचे कथन केले आहे. वादीने केलेल्या आरोपाचा खुलासा होण्ययाकरिता मतपत्रिका तपासणे आवश्यक वाटते. उमेदवार क्र.८ यांना १५२ ऐवजी ५५ मते मिळाल्याचे प्रतिवादी क्र.२ यांनी दाखविल्याचे वादीने कथन आहे आणि त्या आरोपामध्ये तथ्य तपासणी करणे आवश्यक आहे आणि या सर्व बाबींचा खुलासा मतपत्रिका उघडल्यानंतर मिळालेल्या एकुण मतदानावरुन स्पष्ट होईल. वादीने दाव्यात कथन केले की, मतमोजणीमध्ये प्रतिवादी

क्र.२ यांनी चूका केल्या आहेत आणि मिळालेल्या मतांची पत्रिकासुध्दा दुरुस्ती करुन चूकीची तयार केली आणि त्यामध्ये खाडाखोडसुध्दा केली आहे आणि म्हणून फेरमतमोजणी होणे आवश्यक असल्याचे मला दिसुन येते.

प्रतिवादीचे वकील श्री.आंबेकर एम.बी. यांनी युक्तिवाद केला की, वादींनी त्यांच्या दाव्यात केलेली मागणी आणि सदर अर्जात केलेली मागणी एकच असुन निशाणी-५ मधील केलेली मागणी याक्षणी देता येणार नाही. कारण निशाणी-५ वरील मागणी मंजूर केल्यास दाव्यातील केलेली मागणी मंजूर होईल आणि दाव्यातील पुराव्याशिवाय वादीची दाव्यातील अंतिम मागणी मंजूर करता येणे योग्य नाही. वकील श्री.आंबेकर एम.बी. यांनी त्यांच्या युक्तिवादासमर्थ डेंटल कॉन्सील ऑफ इंडिया विरुध्द अनाहाद राजसिंग आणि इतर २०१८(१) एससीसी ७२३ या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचा आधार घेतला. याउलट वादीचे वकील श्री.गुंड पाटील ए.वाय. यांनी युक्तिवाद केला आहे की, वादींनी दाव्यात मागणी केलेली रिलिफ आणि सदर अर्जातील रिलिफ वेगळे असुन प्रतिवादी यांनी दाखल केलेला मा.सर्वोच्च न्यायालयाचे रुलिंग लागू होत नाही. वादी यांनी अर्जामध्ये केलेली मागणी आणि दाव्यात केलेली मागणी वेगळी असल्याचे दिसुन येत आहे. वादीने दाव्यात दि.२०/०५/२०२२ रोजी झालेल्या निवडणुकीचे गुणपत्रक व निकालपत्रक चूकीचे व बेकायदेशीर आहे असा जाहीर ठराव करुन ते रद्द करण्याबाबतची विनंती केली आणि याशिवाय संस्थेची झालेली निवडणुक रद्द ठरविण्याची विनंती केली. परंतु या अर्जामध्ये केवळ वादींनी फेरमतमोजणी करिता कोर्ट कमिशनर नियुक्त करण्याचे विनंती केली.

त्यामुळे वकील श्री.आंबेकर एम.बी. यांनी दाखल केलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्याला मान देऊन सदर प्रकरणात लागू होत नाही. कारण दाव्यातील आणि अर्जातील मागणी केलेले रिलिफ वेगवेगळे आहे.

(७) वादीने दाव्यात उपस्थित केलेल्या मुद्याचा खुलासा होण्याकरिता आणि दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरिता प्रतिवादी क्र.३ संस्थेची दि.२०/०५/२०२२ रोजी झालेल्या निवडणूकीतील मतदानाची फेरमतमोजणी कोर्ट कमिशनरमार्फत होणे आवश्यक आहे. कोर्ट कमिश्नर मार्फत फेरमतमोजणी झाल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याकरिता मी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांनी दिलेला ***गजानन राऊत विरुध्द इफ्तेखार जब्बार यारखा, एम एल जे २०१८ पान क्र.३६३*** या न्यायनिवाडयाचा आधार घेत आहे. या न्यायनिवाड्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने निरिक्षण केले आणि 'Held-order of inspection of ballot paper was proper'. सदर प्रकरणामध्येसुध्दा वादीने फेरमतमोजणी करण्याची मागणी केली. वरील केसमधील वस्तुस्थिती आणि सदर प्रकरणातील वस्तुस्थिती सारखी असल्यामुळे त्यामधील मा.उच्च न्यायालयाने केलेले निरिक्षण प्रस्तुत प्रकरणामध्ये लागू होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये संस्थेने मतमोजणीचे पूर्ण रेकॉर्ड न्यायालयात दाखल केले आहे. त्यामुळे वरील मा.उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यानुसार फेरमतमोजणी होणे आवश्यक आहे. वरील कारणास्तव मी खालील आदेश पारित करित आहे.

## आ दे श

१) वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) संस्थेच्या दि.२०/०५/२०२२ रोजी झालेल्या निवडणुकीतील फेरमतमोजणी नियुक्त कोर्ट कमिशनर मार्फत करण्यात यावी.

३) कोर्ट कमिशनरने फेरमतमोजणी केल्यानंतर अहवाल सादर करावा.

४) दोन्ही पार्टींनी अथवा त्यांच्या वकीलांनी कोर्ट कमिशनरचे नाव न्यायालयाला सूचित करावे.

५) कोर्ट कमिशनरचा खर्च रु.५,०००/- वादी यांनी करावा.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : १८/०२/२०२३

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.